| Newspaper | Page No. | Date |
| --- | --- | --- |
| Pudhari | 05 | 15-07-2014 |

# अंधांनी पाहिला ‘थ्री इडियट’ चित्रपट

**कोरेगाव पार्क : वार्ताहर**

एस्सार स्टील इंडिया कंपनीतर्फे सामाजिक बांधिलकी म्हणून कोरेगाव पार्क येथील अंध शाळेच्या मुलांना थ्री इंडियट हा ध्वनी वर्णीत चित्रपट एकविण्यात आला. महाराष्ट्रात प्रथमच अशा प्रकारचा चित्रपट अंधांसाठी उपलब्ध झाला होता. सुमारे दिडशे अंध विद्यार्थ्यांनी या चित्रपटाचा आनंद लुटला.

कंपनीचे कार्यकारी अधिकारी नितेश शहा यांनी हा सामाजिक उपक्रम राबवला. कार्यक्रमाचे व्यवस्थापन रविंद्र वाघमारे यांनी केले. मनुष्यबळ विकास विभाग प्रमुख मुकुंद जागीरदार, कृष्णा शेवाळ तसेच कंपनीचे पदाधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.